# यावल महाविद्यालयात सूक्ष्मदर्शकाचे महत्त्व व वापर विषयावर कार्यशाळा

यावल (प्रतिनिधी)- जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्र. प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली प्राणीशास्त्र विभागाअंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

विद्यार्थ्यांना 'सुक्ष्मदर्शकाचे महत्व व वापर या विषयावर प्रा.मयुर सोनवणे यांनी मार्गदर्शन करताना सूक्ष्मदर्शकाचे विविध प्रकार व त्याचे महत्त्व सविस्तर सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्या डॉ.संध्या सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना संशोधन करतांना वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी सूक्ष्मदर्शक व इतर उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात करावा लागतो असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजु तडवी यांनी केले.तर आभार प्रा.मनोज पाटील यांनी मानले.

कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा.एम.डी.खैरनार, प्रा.अर्जुन पाटील, उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी अमृत पाटील, अनिल पाटील, प्रमोद जोहरे यांनी सहकार्य केले.



जळगाव तरुण भारत
Main Edition | 2023-09-21 | Page- 8
epaper.tarunbharatjalgaon.com

# यावलला ओझोन दिनानिमित्त सामान्यज्ञान स्पर्धा

**चुंचाळे, ता.यावल** : जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्र.प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल विभागामार्फत ओझोन दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत अनुक्रमे स्वाती संजय बाविस्कर (तृतीय वर्ष विज्ञान, प्रथम), नंदिनी दिलीप गुजर (तृतीय वर्ष विज्ञान, द्वितीय), टिनू गणेश पाटील (तृतीय वर्ष कला, तृतीय). आयोजन प्रा. नरेंद्र पाटील, प्रा. अर्जुन गाढेयांनी केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी उपप्राचार्य प्रा.ए.पी.पाटील, प्रा.एम.डी.खैरनार, डॉ.आर.डी.पवार, प्रा.सुभाष कामडी, प्रा.प्रशांत मोरे, शाहरुख तडवी, तेजश्री कोलते, सागर धनगर आदींनी परीश्रम घेतले.

Powered by iDocuments